क्रमांक : १२२७६/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ५ ऑगस्ट, २०२५.

संदर्भ :- १) सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि. १ ऑगस्ट, २०१९
२) या सचिवालयाचे ज्ञापन क्र. २२३९१/क-१, दि. १३ नोव्हेंबर, २०२४

:: **ज्ञा प न** ::

या सचिवालयातील प्रधान सचिव आणि सचिव या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सेवाप्रवेश आणि सेवेच्या शर्ती) नियम, १९७३ मधील नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार करण्यात येते. या व्यतिरिक्त 'गट-अ' ते 'गट-ड' संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर आवश्यक असणारी अर्हता धारण करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना पदोन्नती / पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयातील एकत्रित मार्गदर्शक तत्वे व या सचिवालयातील सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती यातील विहित नियमांनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यास शिफारस करण्याकरिता **आस्थापना मंडळ** आणि **विभागीय पदोन्नती समिती** नव्याने गठीत करण्यात आली आहे. सदर आस्थापना मंडळ आणि विभागीय पदोन्नती समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील :-

आस्थापना मंडळ

| **गट** | **आस्थापना मंडळातील अधिकारी / सदस्य** | | **अधिकारी/सदस्य यांची एकूण संख्या** |
|---|---|---|---|
| 'गट-अ' (राजपत्रित)<br>(६ व्या वेतन आयोगानुसार ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७६००/- किंवा त्यापेक्षा जास्त तथापि रु.१०,०००/- पेक्षा कमी) | सचिव-१ | अध्यक्ष | किमान तीन<br>किंवा<br>कमाल पाच |
| | सचिव-२ | सदस्य | |
| | सचिव-३ | सदस्य | |
| | सचिव-४ | सदस्य | |
| | सह सचिव / उप सचिव<br>(आस्थापना - क-१ कक्ष) | सदस्य सचिव | |

## विभागीय पदोन्नती समिती

| गट | विभागीय पदोन्नती समितीतील अधिकारी / सदस्य | | अधिकारी/सदस्य यांची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| 'गट-अ' (राजपत्रित), 'गट-ब' (राजपत्रित) व (अराजपत्रित) तसेच 'गट-क' व गट 'ड' (६ व्या वेतन आयोगानुसार ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७५९९/- किंवा त्यापेक्षा कमी) | सचिव-३ | अध्यक्ष | किमान तीन किंवा कमाल पाच |
| | सचिव-४ | सदस्य | |
| | सह सचिव | सदस्य | |
| | उप सचिव | सदस्य | |
| | सह सचिव / उप सचिव (आस्थापना - क-१ कक्ष) | सदस्य सचिव | |

सदरहू विभागीय पदोन्नती समिती खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून गठीत करण्यात आली आहे :-

- **विभागीय पदोन्नती समिती किमान ३ व कमाल ५ सदस्यांची असावी.**
- **विभागीय पदोन्नती समितीच्या गठनासंदर्भातील आदेश समिती सदस्याच्या नावाने निर्गमित न करता त्यांच्या पदनामाने करावेत.**
- **विभागीय पदोन्नती समितीमध्ये मागास प्रवर्गाकरिता प्रतिनिधीत्व करणारा एक सदस्य असावा. असा सदस्य नसल्यास, समितीच्या अध्यक्षांच्या सहमतीने मागास प्रवर्गाचे प्रतिनिधीत्व करण्याकरिता एका अधिकाऱ्याचा निमंत्रित सदस्य म्हणून समावेश करावा.**

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे)**
सह सचिव (समिती) तथा वि.का.अ.,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
४) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) आस्थापना मंडळ व विभागीय पदोन्नती समितीतील अधिकारी/सदस्य
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी.
९) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सदरहू ज्ञापन या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.)
१०) निवडसूची